भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता व-हाळादेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल,निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेच्या ई निविदेतील कमी दराला प्रशासकीय मंजूर मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे व-हाळदेवी नविन जलशुध्दीकरण केंद्रातून दररोज पाणी पुरवठा भिवंडी शहरांतील काही भागात करण्यांत येतो. जलशुध्दीकरण केंद्राच्या दैनंदिन देखभाल, निगा व दुरुस्ती तसेच जलशुध्दीकरणांत होणारी पंपींग व-हाळा जी एस आर पातळीची तपासणी करणे इत्यादी कामे करणेकरीता कर्मचा-यांची आवश्यकता भासते.

व-हाळा जलशुध्दीकरण केंद्र चालू करणेकरीता व जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरुस्ती करीता तीन शिफत मध्ये कर्मचा-यांची आवश्यकता आहे. सदर जलशुध्दीकरण केंद्राकरीता मनपाचे पुरेसे कर्मचारी उपलब्ध असल्याने जलशुध्दीकरण केंद्र चालविणे कामी खाजगी कर्मचा-यांची आवश्यकता आहे.

सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता व-हाळादेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल,निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेबाबत कामाची ४ महिन्याकरीता रु.१०,७४,५६०/- मात्रची ई निविदा सुचना क्र. ५१ दि.१३/१०/२०२२ ते दि.२०/१०/२०२२ या कालावधीत मनपाच्या महाटेंडर व राष्टीय हिंदी दैनिक तरुणमित्र या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आली होती, दि.१३/१०/२०२२ रोजी ई निविदा,निविदा समिती समोर उघडली असता एकुण ९ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता व-हाळादेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल,निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेच्या ई निविदेतील कमी दराला प्रशासकीय मंजूर मिळणेबाबत.** | **रु.१०,७४,५६०/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

सदर कामाकरीता मे राम दशरथ कोरे यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २ टक्के कमी दराने म्हणजेच रुपये १०,७४,५६०/- मात्र आहे. मे.राम दशरथ कोरे यांना सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता व-हाळादेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल,निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेच्या ई निविदेतील कमी दराला प्रशासकीय मंजूर मिळणेबाबतच्या ई निविदेतील दरांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** 84 **दिनांक :** 26/09/ २०२२

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता व-हाळादेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल,निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील

शासन निर्णय क्र.एम.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र, महानगरपालिका अधिनियमा तील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता व-हाळादेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल,निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणे बाबतचाच्या निविदेतील दरांना मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**